action edn922


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी : (०२०) २५५३ ७६८८.

वेबसाईट : www.mcaer.org फॅक्स : (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण/३९१५/२८८ दि. ११ फेब्रुवारी,२०१६

## प रि प त्र क

विषयः- नवीन विना अनुदान तत्वावरील कृषी व संलग्न महाविद्यालयांच्या परवानगीसाठी द्यावयाच्या अर्जाच्या प्रस्तावाची छाननी, नवीन तुकडीवाढ इत्यादीबाबतच्या शुल्कात वाढ.

राज्यामध्ये विना अनुदान तत्वावर कृषी व संलग्न महाविद्यालये स्थापन करण्यासाठी वेळोवेळी कृषी परिषदेकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी अर्ज आणि त्यासाठीची माहिती पुस्तिका याबद्दल मागणी करण्यात येते. मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने यासंबंधी निर्णय घेण्यात येतात. एकदा अर्ज आणि माहिती पुस्तिका दिल्यानंतर नवीन विना अनुदान तत्वावर कृषी व संलग्न महाविद्यालयांसाठी प्रस्ताव कृषी विद्यापीठाकडे / कृषी परिषदेकडे सादर केले जातात. अशाप्रकारे प्रस्ताव सादर झाल्यानंतर त्यांची विद्यापीठस्तरावर आणि त्यानंतर कृषी परिषदेच्या स्तरावर छाननी केली जाते. छाननी नंतर प्रस्ताव परिपूर्ण असल्यास मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने / कृषी परिषदेच्या मान्यतेने नवीन कृषी व संलग्न महाविद्यालयांना परवानगी दिली जाते. काही प्रस्तावांमध्ये थोडयाबहुत त्रुटी असल्यास त्या त्रुटींची पूर्ततेच्या अधीन राहून परवानगी देणे गरजेचे ठरते. या सर्व प्रक्रियेमध्ये कृषी विद्यापीठाच्या स्तरावर तसेच कृषी परिषदेच्या स्तरावर प्रस्तावांची छाननी करणे, त्यावर आवश्यक ती कार्यवाही करणे, पत्रव्यवहार करणे, सदर प्रस्ताव कृषी परिषदेसमोर ठेवणे इत्यादी कामासाठी मनुष्यबळाचा मोठया प्रमाणावर वापर करणे आवश्यक ठरते. अलिकडच्या काळातील सर्वच क्षेत्रामध्ये झालेल्या किंमती वाढीमुळे आणि या कामाचे मूल्य लक्षात घेता, नवीन विना अनुदानित कृषी व संलग्न महाविद्यालयांच्या परवानगीसंबंधी तसेच विना अनुदानित महाविद्यालयांच्या तुकडीवाढसंबंधी करावयाच्या विविध कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे शुल्काची आकारणी निश्चित करण्यात येत आहे.

१. संस्थेचा कृषी व संलग्न महाविद्यालयाच्या प्रस्तावासाठी अर्ज व माहिती पुस्तिका मागण्याकरिता अर्ज कृषी परिषदेस प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थेच्या अर्जात नमूद केलेल्या बाबींची छाननी व पडताळणी करण्यात येईल. पात्रता अथवा अपात्रतेची छाननी व पडताळणी करण्याकरिता छाननी शुल्क रु.५.०० लाख आकारण्यात येईल. सदर शुल्क संस्थेने धनाकर्षाद्वारे कृषी परिषदेकडे जमा करावयाचे आहे. तद्नंतर केवळ अर्ज व माहिती पुस्तिका संस्थेस उपलब्ध करून देण्याकरिता रू.५०००/- इतके शुल्क आकारण्यात येईल.

२. नवीन कृषी व संलग्न महाविद्यालयांच्या प्रस्तावांचे प्रक्रिया शुल्क रू. ८.०० लाख राहील. संस्थेने सदरचे शुल्क कृषी परिषदेकडे प्रस्तावासोबत धनाकर्षाद्वारे भरावयाचे आहे. कृषी परिषद यापैकी रू. ३.०० लाख संबंधित कृषी विद्यापीठाकडे पाठविल.

३. काही त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवर प्रस्ताव मान्य झाला असेल तर त्याप्रकरणामध्ये त्रुटींच्या पूर्ततेच्या अहवालाबरोबर रू.३.०० लाख शुल्क संबंधित संस्थेने कृषी परिषदेकडे जमा करावे. अशाप्रकारच्या त्रुटींची पडताळणी कृषी परिषदेमार्फत करण्यात येईल. एकाच वेळी त्रुटींची पूर्तता झाली नाही तर दुसऱ्या वेळेस आणि त्यानंतरच्या प्रत्येक वेळेस रू.३.०० लाख शुल्क संस्थेस कृषी परिषदेकडे जमा करावे लागेल.

action edn922

४. नवीन विना अनुदानित कृषी व संलग्न महाविद्यालयास परवानगी मिळाल्यानंतर महाविद्यालय सुरु करतांना कृषी विद्यापीठाकडे द्यावयाच्या बँक गॅरंटी व डिपॉझीटची रक्कम सध्या प्रत्येकी रू.५.०० लाख आहे. याऐवजी बँक गॅरंटी रद्द करण्यात येत असून डिपॉझीटची रक्कम रू.२०.०० लाख अशी करण्यात येत आहे. संस्थेने सदर डिपॉझीटची रक्कम कृषी परिषदेकडे जमा करावी. सदरची रक्कम कृषी परिषदेच्या खात्यात डिपॉझीट म्हणून जमा राहील. कृषी परिषदेकडे ही रक्कम जमा झाल्याशिवाय संबंधीत नवीन महाविद्यालयासाठी प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार नाही.

५. वरील सर्व वाढीव शुल्काचे दर आजपावेतो नवीन विना अनुदान तत्वावरील कृषी व संलग्न महाविद्यालयांसाठी दिलेले अर्ज व माहिती पुस्तिका घेतलेल्या संस्थांना तसेच यानंतर अर्ज व माहिती पुस्तिका घेणाऱ्या संस्थांना लागू करण्यात येत आहेत. यापूर्वी अर्ज व माहिती पुस्तिका घेतलेल्या व ज्यांचे प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहेत, अशा संस्थांना सदर वाढीव शुल्क भरल्यानंतर त्यांच्या अर्जांची छाननी सुरु करण्यात येईल, अन्यथा त्यांचे अर्ज रद्द समजण्यात येतील.

६. विना अनुदानित कृषी व संलग्न महाविद्यालय मंजूर झाल्यानंतर सध्याच्या निकषाप्रमाणे चार वर्षे पूर्ण झाल्यानंतर तुकडीवाढीसाठी मागणी करण्यात येते. तुकडीवाढीसंदर्भात ६० प्रवेश क्षमतेने तुकडीवाढीसाठी रू.८.०० लाख प्रक्रिया शुल्क व ४० प्रवेश क्षमतेने तुकडीवाढीसाठी रू.५.०० लाख प्रक्रिया शुल्क निश्चित करण्यात येत आहे. सदर शुल्क संबंधित संस्थेने धनाकर्षाद्वारे कृषी परिषदेकडे प्रस्तावासोबत जमा करावे. सदरची रक्कम कृषी परिषदेकडेच राहील.

७. वरील मुद्दा क्र. ४ मधील बाबी वगळता सर्व रक्कमा ना परतावा (Non refundable) असतील.

वरील शुल्क तात्काळ प्रभावाने लागू करण्यात येत आहे.

**मा.मंत्री (कृषी) तथा**
**अध्यक्ष, कृषी परिषद**
**यांच्या मान्यतेने.**

संचालक (शिक्षण)
कृषी परिषद, पुणे

प्रति,

कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी),
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली

प्रत:-

१. मा.मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांचे विशेष कार्य अधिकारी, मा.मंत्री (कृषी) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. उपाध्यक्ष यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
३. मा. महासंचालक यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
४. वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
५. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९ यांना सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
६. निवड नस्ती.